अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई — ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :— १२.०५.२०२३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.नों.क्र. | २२/२०२३ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालयाचा पत्ता | श्री. अशोक तानु जाधव, वय-५६वर्षे, नोकरी- कनिष्ठ अवेक्षक, वर्ग-३, घन कचरा व्यवस्थापन, शिवाजीनगर चौकी क. १, बृहंन्मुंबई महानगर पालिका, एम पुर्व वॉर्ड, गोवंडी, मुंबई ४३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १०,०००/- |
| हस्तगत केलेली रक्कम | रु. १०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | यातील फिर्यादी हे व्यवसायाने सफाई कंत्राटदार असुन त्यांच्या संस्थमार्फत फिर्यादी हे शिवाजीनगर चौकी क. १, बृहंन्मुंबई महानगर पालिका, एम पुर्व वॉर्ड, गोवंडी, मुंबई ४३ या विभागातील साफ सफाईचे काम टेंडर भरून घेत असतात. त्याप्रमाणे फिर्यादी यांचे संस्थेस सन मार्च २०२३ व एप्रिल २०२३ या महिन्यांचे वर नमुद विभागातील साफ सफाईचे कंत्राट मिळाले होते.<br>नमुद कालावधीतील केलेल्या कामाचे मार्च २०२३ चे रू. ७२,०००/- व एप्रिल २०२३ चे रू. ७२,०००/- असे बिल बृहंन्मुंबई महानगर पालिका, एम पुर्व वॉर्ड, गोवंडी, मुंबई ४३ येथे सादर करण्यापुर्वी फिर्यादी यांना सदर कामाच्या बिलावर घन कचरा व्यवस्थापन, शिवाजीनगर चौकी क. १, बृहंन्मुंबई महानगर पालिका, एम पुर्व वॉर्ड, गोवंडी, मुंबई ४३ येथील अधिकारी कनिष्ठ अवेक्षक श्री. अशोक तानु जाधव यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असते. त्याप्रमाणे फिर्यादी हे दि. ०७/०५/२०२३ रोजी हे नमुद लोकसेवक यांचे कार्यालयात त्यांचे कामाचे बिलावर लोकसेवकांची स्वाक्षरी घेण्याकरीता गेले असता लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्याकडे त्यांनी केलेल्या कामाच्या बिलावर स्वाक्षरी करण्याकरीता प्रति बिल रू. ५०००/- प्रमाणे एकुण १०,०००/- रू. लाचेची मागणी केली. परंतु फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या कार्यालयास लोकसेवकाविरूध्द दि. ११/०५/२०२३ रोजी लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरून दिनांक १२/०५/२०२३ रोजी पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान लोकसेवकाने रू.१०,०००/-लाचेची मागणी करुन, ती घेण्याचे मान्य केले. त्यानंतर केलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री.अशोक जाधव यांना फिर्यादी यांचेकडुन लाचेची रक्कम रू. १०,०००/-स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते बृहन्मुंबई

12/05/2023
( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या आलोसेबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, मोबाईलॲप :- www.acbmaharashtra.net
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB